दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
✻ (आष्टी) वर्धा ✻ गुरुवार, दि.२ डिसेंबर २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १०० ✻ पृष्ठ ४ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

खाद्यतेलाच्या दरात ३० टक्के वाढ; निर्यात शुल्क, सोयाबीन दरात वाढ झाल्याचा परिणाम

नवी मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून स्थिर असलेले तेलाचे दर आता वधारले आहेत. सोयाबीन दरात वाढ झाल्याने आणि केंद्र सरकारने २० टक्के आयात शुल्क आकारल्याने तेलाच्या दरात ३० टक्के वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून आवक कमी होत आहे, त्यामुळे तेलाचे दर वधारले आहेत. दोन महिन्यांपूर्वीही तेलाच्या दरात वाढ झाली होती आणि आता पून्हा दर कडाडले आहेत. दोन वर्षांपूर्वी तेलाच्या दराने उच्चांक गाठला होता, मात्र हळूहळू तेलाचे दर पूर्ववत झाले होते. गेल्या कित्येक महिन्यांपासून तेलाचे दर स्थिरावले होते. परंतु आता पुन्हा तेलाच्या दराने उसळी घेतली आहे. सरकारने सोयाबीन, दर वाढवले आहेत, शिवाय २० टक्के आयात शुल्क लावल्याने दर वधारले आहेत. एपीएमसी बाजारात महिन्याला ७ ते आठ ८ टन तेलाची आवक होत असते मात्र मागणी वाढल्यामुळे तेलाचा पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे बाजारात तेलाची आवक ही कमी होत आहे, त्यामुळे ३० टक्के दर वधारले आहेत अशी माहिती एपीएमसी व्यापाऱ्यांनी दिली आहे.

वहिनीचे प्रेम मिळविण्यासाठी युवकाने केला भावाचा खून

वृत्तसंस्था ■ नागपूर



नागपूर : वहिनीसोबत दीराचे सूत जुळले. त्याची कुणकुण मोठ्या भावाला लागली. प्रेमसंबंधात मोठा भाऊ अडसर ठरत होता. त्यामुळे वहिनीचे प्रेम मिळविण्यासाठी लहान भावाने मोठ्या भावाचा पुतण्याच्या मदतीने दगडाने ठेचून खून केला. मृतदेह जंगलात फेकून पळ काढला. मात्र, बुटीबोरी पोलिसांनी मोठ्या शिताफीने हत्याकांडाचा छडा लावून दोघांनाही अटक केली. चंद्रकांत असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पंकेश आणि बंटी अशी आरोपींची नावे आहेत.

चंद्रकांत (४०) हा जामठ्यात शेतमजुरी करायचा. त्याला पत्नी व एक मुलगा बंटी आहे. त्याच्या घराशेजारी त्याचा चुलत भाऊ पंकेश (३०) राहतो. चंद्रकांतला दारुचे व्यसन होते. तो घरातही पत्नी व मुलाशी वाद घालत होता. पतीचे घरात दुर्लक्ष आणि दारुच्या व्यसनाला पत्नी माधुरी (बदललेले नाव) कंटाळली होती. पंकेश हा विवाहित असून त्याला दोन मुले आहेत. त्याचे माधुरीशी चांगले संबंध होते. मोठा भाऊ चंद्रकांत हा पत्नीचा छळ करीत असल्याची त्याला जाणिव होती. अनेकदा पंकेश हा चंद्रकांत आणि माधुरीचे भांडण सुरु असल्यानंतर त्यांच्या घरी जाऊन भांडण सोडवत होता. माधुरी ही पंकेशसोबत किराणा आणायला, खरेदी करायला किंवा अन्य कामासाठी जात होती. यादरम्यान, दोघांची जवळीक वाढली. प्रेमसंबंध जुळले. याबाबत माधुरीचा मुलगा बंटी यालाही माहिती होती. मात्र, वडिलाचा स्वभाव बघता त्यानेही आईच्या प्रेमसंबंधाला मूकसंमती दिली.

अनैतिक संबंधाची पतीला कुणकुण

माधुरी आणि पंकेश या दोघांचे अनैतिक संबंध बरेच वाढले. दबक्या आवाजात वस्तीत दोघांच्या प्रेमाची चर्चा होती. ती चंद्रकांतच्या कानावर आली. त्यामुळे त्याने दोघांवर पाळत ठेवली. महिनाभरापूर्वी शेतावर जाणार असल्याचे सांगून तो तासाभरात घरी परतला. त्यावेळी पंकेश हा त्याच्या घरी आढळून आला. त्यामुळे दोघांनाही चंद्रकांतने मारहाण केली.

असा केला खून

वहिनीला नेहमी मारहाण होत असल्यामुळे पंकेशचा जीव तुटत होता. त्याने पुतण्या बंटीला हाताशी धरले आणि चंद्रकांतचा खून करण्याचा कट रचला. सोमवारी रात्री चंद्रकांतला दारु पिण्यासाठी बोलावले. उमरेड-बुटीबोरी राज्य महामार्गावर नेऊन दारु पाजली. त्यानंतर बंटी आणि पंकेशने चंद्रकांतचा गळा आवळून खून केला. ओळख पटू नये म्हणून त्याच्या चेहरा दगडाने ठेचला. मात्र, दुसऱ्या दिवशी पोलिसांनी तंत्रज्ञान व गुप्त माहितीच्या आधारे हत्याकांडाचा छडा लावला. आरोपींना अटक केली.

ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी- ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते.

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कंत्राटी कामगार वेतन थकबाकीसंदर्भातील आढावाही यावेळी घेण्यात आला.

पुणे स्टेशन परिसरात प्रवासी तरुणाला लुटले; रिक्षाचालकासह साथीदाराविरुद्ध गुन्हा

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : प्रवासी तरुणाला धमकावून रिक्षाचालक आणि साथीदारांनी सहा हजारांची रोकड लुटून नेल्याची घटना घडली. पुणे रेल्वे स्थानक परिसरातून रिक्षाचालकाने तरुणाला सोडण्याच्या बहाण्याने त्याला निर्जन ठिकाणी नेऊन लुटल्याचे उघडकीस आले आहे .याप्रकरणी रिक्षाचालकासह साथीदारांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका २० वर्षीय तरुणाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, रिक्षाचालकासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण मूळचा चाकणचा आहे. तो कामानिमित्त सोमवारी (३० डिसेंबर) सकाळी सहाच्या सुमारास पुणे स्टेशन परिसरात आला. तेथून तो रिक्षाने जाणार होता. तुकाराम शिंदे वाहनतळाजवळ रिक्षाचालकाला त्याने इच्छितस्थळी सोडण्यास सांगितले. रिक्षाचालक आणि त्याच्याबरोबर साथीदार होता. तरुणाला रिक्षातून घेऊन त्याला निर्जन ठिकाणी नेले. त्याला शिवीगाळ, तसेच मारहाण करुन खिशातील १२०० रुपयांची रोकड काढून घेतली.

त्यानंतर रिक्षाचालकाने त्याच्याकडे आणखी पैसे मागितले. तरुणाला ऑनलाइन पद्धतीने पैसे जमा करण्यास सांगितले. तरुणाने ऑनलाइन पद्धतीने रिक्षाचालकाकडे चार हजार ९०० रुपये जमा केले. तरुणाला सोडून रिक्षाचालक साथीदारासह पसार झाला. घाबरलेल्या तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक कदम तपास करत आहेत. शहरात लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या वर्षी पादचाऱ्यांकडील मोबाइल संच, दागिने चोरून नेणे, धमकावून रोकड लुटणे अशा प्रकारचे १६७ हून जास्त गुन्हे दाखल झाले आहेत.

ज्वारीची पेरणी घटली; मका, करडईची वाढली, रब्बी हंगामातील पेरण्यांची पीकनिहाय स्थिती

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यात यंदाच्या रब्बी हंगामात उच्चांकी पेरणी झाली आहे. डिसेंबरअखेर ५८ लाख ६८ हजार ७२८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. मका, करडईच्या क्षेत्रात वाढ तर ज्वारीच्या पेरणीत घट झाली आहे. जानेवारीअखेर रब्बीतील पेरण्या होतात, त्यामुळे यंदा विक्रमी क्षेत्रावर लागवड होण्याचा अंदाज आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील रब्बी हंगामातील सरासरी क्षेत्र ५३ लाख ९६ हजार ९६९ हेक्टर आहे. गत वर्षी ४८ लाख ६५ हजार ३२० हेक्टरवर पेरणी झाली होती. यंदा डिसेंबरअखेर ५८ लाख ६८ हजार ७२८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. डिसेंबरअखेर सरासरी क्षेत्राच्या तुलनेत १०८ टक्के तर गत वर्षाच्या तुलनेत १२१ टक्के पेरणी झाली आहे. ऊसतोडणी होईल तसे उशिराने मका, हरभऱ्यासह अन्य चारा पिकांची लागवड जानेवारीअखेरपर्यंत होत असते. त्यामुळे यंदा रब्बीत विक्रमी क्षेत्रावर लागवड होण्याचा अंदाज आहे.

श्री अन्न आणि आरोग्यादायी म्हणून ज्वारीची प्रचार - प्रसिद्धी होत असली तरीही ज्वारीच्या लागवडीत घट झाली आहे. रब्बीतील ज्वारीचे क्षेत्र सरासरी १७.५० लाख हेक्टर आहे. गतवर्षी १३.६४ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती, यंदा १४.५२ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. रब्बीतील अन्य पिकांनी सरासरी ओलांडली असली तरीही ज्वारीच्या लागवडीने जेमतेम सरासरीच्या ८३ टक्क्यांपर्यंत मजल मारली आहे. यापुढे ज्वारीच्या लागवडीत फारशी वाढ होण्याची शक्यता नाही. गव्हाच्या लागवडीने सरासरी गाठली आहे. दहा लाख हेक्टरवर लागवड होते, यंदा ११.३६ लाख हेक्टरवर पेरा झाला आहे.

मका लागवडीने मोठी गती घेतली आहे. इथेनॉलसाठी मक्याला मागणी वाढल्यामुळे दर ३० रुपये किलोपर्यंत गेल्याचा परिणाम मका लागवडीवर झाला आहे. रब्बीत सरासरी २.५८ लाख हेक्टर क्षेत्र असताना ४ लाख ३० हजार २६८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. डिसेंबरअखेर सरासरीच्या १६६ टक्के पेरणी झाली आहे, त्यात आणखी वाढीचा अंदाज आहे. एकूण तेलबियांची पेरणी सरासरीपेक्षा कमी झाली असली तरीही करडईच्या पेरण्यांनी आघाडी घेतली आहे. करडईचे सरासरी क्षेत्र २६ हजार हेक्टर आहे, यंदा ३१ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. जवस, तीळ, सूर्यफूल, मोहरीच्या लागवडीने अद्याप सरासरी गाठली नाही.

पेरणी क्षेत्रात आणखी वाढ शक्य

पावसाळ्यात राज्यात सर्वदूर दमदार पाऊस झाल्यामुळे पाण्याची उपलब्धता चांगली आहे. त्यामुळे यंदा रब्बीतील पेरण्यांनी गती घेतली आहे. शेतकरी ऊसतोडणीनंतर लागवडी करतात, त्यामुळे जानेवारीअखेरपर्यंत पेरण्या होतील. यंदा रब्बीत विक्रमी क्षेत्रावर पेरण्या होण्याचा अंदाज आहे, अशी माहिती कृषी संचालक (विस्तार आणि विकास) रफिक नायकवडी यांनी दिली.

३१ डिसेंबरच्या रात्री ३११ मद्यपी चालकांविरोधात कारवाई

वृत्तसंस्था ■ ठाणे

ठाणे : नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला अनेकजण मद्य पिऊन वाहन चालवितात. या पार्श्वभूमीवर ठाणे वाहतुक पोलिसांनी ३११ मद्यपी वाहन चालकांविरोधात आणि त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५८ सह प्रवाशांविरोधात कारवाई केली आहे. ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ही कारवाई करण्यात आली आहे.

नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला मोठ्याप्रमाणात पार्ट्यांचे आयोजन केले होते. त्यामुळे मंगळवारी रात्री ठाणे जिल्ह्यातील विविध भागात ढाबे, हॉटेल आणि फार्म हाऊसमध्ये पार्ट्यांसाठी नागरिकांची गर्दी झाली होती. पार्टी केल्यानंतर अनेकजण मद्य पिऊन वाहने चालवितात. या प्रकारामुळे अपघाताची भिती निर्माण होत असते. तसेच मद्यपी वाहन चालकांसोबत सह प्रवासी देखील असतात. या घटनेत मद्यपी वाहन चालकामुळे इतर प्रवाशांच्या जीवावरही बेतण्याची शक्यता असते. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलिसांनी आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात मुख्य चौकांमध्ये वाहन चालकांची तपासणी केली होती. या कारवाईत ३११ वाहन चालक हे मद्य पिऊन वाहने चालवित असल्याचे आढळून आले. या वाहन चालकांविरोधात दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तर त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५८ सह प्रवाशांवरही पोलिसांनी कारवाई केली आहे. सर्वाधिक मद्यपी वाहन चालकांविरोधात ठाणे आणि कल्याण शहरात करण्यात आली.

उच्च न्यायालयातील वकिलाची दीड कोटींची सायबर फसवणूक

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : शेअर्स खरेदी-विक्रीद्वारे चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून उच्च न्यायालयातील ५२ वर्षीय वकिलाची दीड कोटी रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आली असून सायबर पोलिसांनी याप्रकरणी माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. बँक व्यवहाऱ्यांच्या साहाय्याने आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

तक्रारादार खार येथील रहिवासी असून त्यांना १३ जुलै २०२४ रोजी शेअर्स खरेदी-विक्रीतून चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यांना एका व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. अमेरिकेतील सिक्युरिटी नावाने हा ग्रुप तयार करण्यात आला होता. पोलिसांच्या तक्रारीनुसार, दिलेल्या लिंकवर वकिलांनी क्लिक केल्यानंतर त्यांना व्हीआयपी व्हॉट्स ?प ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. त्यात गुंतवणूकीबाबत सल्ला देण्यात येत होता. वकिलांनी सुरुवातीला लहान रक्कम गुंतवून पाहिली आणि त्यांना फायदा झाल्याचे निदर्शनास आले.

तक्रारदाराचा विश्वास संपादन केल्यानंतर फसवणूक करणाऱ्यांनी त्यांना बीव्हीई नावाचे ?प इन्स्टॉल करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर वकील त्या ॲपच्या माध्यमातून शेअर बाजारात गुंतवणूक करू लागले, असे पोलीस सूत्रांनी सांगितले. ग्राहक सेवा सहाय्यक त्यांना गुंतवणूकीबाबत मदत करीत होता आणि गुंतवणुकीसाठी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यासाठी मार्गदर्शन करीत होता. हळूहळू तक्रारदाराने एक कोटी ५८ लाख रुपये गुंतवले. ?पमध्ये त्यांना चार कोटी रुपये नफा झाल्याचे दिसत होते. त्यावेळी तक्रारदार वकिलांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला. पण पैसे हस्तांतरित झाले नाहीत. त्यांनी सेवा कार्यकारी व्यक्तीशी संपर्क साधला असता त्याने रकमेवर कर भरल्यानंतर ती हस्तांतरित होईल, असे सांगितले. कर भरूनही तक्रारदारांना रक्कम काढता आली नाही. त्यानंतर त्यांना व्हॉट्स ?प ग्रुपमधून काढण्यात आले.

अखेर तक्रारदार वकिलांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. याप्रकरणी नुकतीच पश्चिम प्रादेशिक सायबर पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून फसवणूक करणाऱ्या सायबर टोळीच्या सदस्यांचा शोध घेण्यात येत आहे.

ठाणे कारागृहातील बंद्याची करामत, सँडलच्या सोलमध्ये लपवून आणला होता मोबाईल

वृत्तसंस्था ■ ठाणे

ठाणे : ठाणे मध्यवर्ती कारागृहातील एका न्यायबंद्याने सँडलच्या सोलमधून मोबाईल आणल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी न्यायबंद्याविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृहात शेकडो बंदीवान आहेत. तसेच अनेक मोठे कैदी देखील या कारागृहात आहेत. ३० डिसेंबरला कारागृहातील झडती पथक बॅरेक क्रमांक तीनमध्ये झडती घेत होते. या बॅरेकमध्ये २०० न्यायबंदी होते. झडती घेत असताना बॅरेकमधील भिंतीवर खिळ्याला अडकविलेली पिशवी होती. या पिशवीत सँडेलचा जोड ठेवल्याचे झडती पथकाला आढळले. त्यामुळे पथकातील कर्मचाऱ्यांनी सँडेलचे वजन तपासले. यातील डाव्या पायातील सँडेल उजव्या पायातील सँडेलपेक्षा जास्त वजनाचा आढळून आला. पथकाला संशयास्पद आढळून आल्याने त्यांनी याबाबतची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. वरिष्ठांच्या आदेशानंतर सँडलचे सोल काढले असता, त्यामध्ये एक मोबाईल आढळून आला. मोबाईलची तपासणी प्रशासकीय विभागात करण्यात आल्यानंतर मोबाईल बंद अवस्थेत होते. तसेच त्यामध्ये सीमकार्डही नव्हते. पथकाने मोबाईलबाबतची माहिती घेतली असता, हा मोबाईल प्रथमदर्शनी काशिमीरा पोलीस ठाण्यातील एका प्रकरणामधील न्यायबंदी असल्याचे समोर आले. हा न्यायबंदी सप्टेंबर २०२३ पासून कारागृहात आहे. त्याच्याविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २४५ तसेच कारागृह कायदा १८९४ कलम ४२, ४५ (१२) नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

बेताल चालकांवर कारवाई, १७ हजारांहून अधिक चालकांना ८९ लाख रुपये दंड

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मावळत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे जल्लोषात स्वागत करताना नियमांना तिजांजली देत बेतालपणे वाहने चालविणाऱ्या तब्बल १७ हजार ८०० वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून त्यामध्ये ३३३ मद्यपी चालकांचा समावेश आहे. शिवाय विनाहेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या तीन हजार ५०० दुचाकीस्वारांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आली. मुंबईतील सर्व पोलीस ठाणी व वाहतूक पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. नियम धाब्यावर बसविणाऱ्या चालकांवर ८९ लाख १९ हजार रुपये दंड आकारण्यात आला. मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणी तब्बल १४,५०० पोलीस तैनात करण्यात आले होते.

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुंबई पोलीस आठवडाभर विशेष मोहीम राबवीत होते. नववर्षाच्या पूर्वसंध्येलाही वाहतूक पोलिसांनी १०७ ठिकाणी नाकाबंदी केली होती. या वेळी वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी २८९३ जणांवर कारवाई करण्यात आली. विनाहेल्मेट १९२३ दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. याशिवाय प्रवासी भाडे नाकारणाऱ्या १९७३ रिक्षा, टॅक्सी चालकांवर कारवाई करण्यात आली, असे वाहतूक पोलिसांनी सांगितले.

याशिवाय सिग्नल तोडणाऱ्या १,७३१, प्रवेश मनाई असलेल्या मार्गावरून वाहन नेणाऱ्या ८६८, अतिवेगाने वाहन चालवणाऱ्या ८४२, झेब्रा क्रॉसिंगपूर्वी वाहन न थांबवणाऱ्या ४४० जणांवर, सीट बेल्ट न लावता वाहन चालवणाऱ्या ४३२, गणवेशाशिवाय टॅक्सी अथवा रिक्षा चालवणाऱ्या २००, दुचाकीवर तिघांनी प्रवास करणाऱ्या १२३, वाहन चालवताना मोबाइलचा वापर करणाऱ्या १०९, विरुद्ध दिशेने वाहन चालवणाऱ्या ४०, नियमबाह्य प्रकारे हॉर्न वाजवणाऱ्या २०, असुरक्षितरीत्या वाहन चालवणाऱ्या दोघांवर आणि मुंबई वाहन कायद्याअंतर्गत पाच हजार ४६७ जणांवर कारवाई करण्यात आली. या सर्वांविरोधात एकूण १७ हजार ८०० ई - चलन जारी करण्यात आले असून त्याअंतर्गत ८९ लाख १९ हजार ७५० दंड आकारण्यात आला आहे. या वेळी मुंबई पोलिसांनी ४६ हजार १४३ वाहनांची तपासणी केली.

निर्भया पथकांची नेमणूक

नवीन वर्षाचे स्वागत आणि सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी अनेक तरुणी, महिला तसेच अल्पवयीन मुली घराबाहेर पडतात. मात्र नेमके यादरम्यान मद्याच्या नशेत धुंद झालेले अनेक जण महिलांची छेडछाड करतात अथवा विनयभंगसारख्या घटना घडण्याची शक्यता असते. असे प्रकार घडू नयेत यावर कटाक्षाने लक्ष ठेवण्याचे आदेश प्रत्येक पोलीस ठाण्याला देण्यात आले होते. त्यासाठी निर्भया पथकाला गस्त घालण्याचे आदेश देण्यात आले होते. नववर्ष स्वागतानिमित्त ३० डिसेंबर रोजी सायंकाळपासूनच रस्त्यांवर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गेट वे ऑफ इंडिया, मरिन ड्राइव्ह, वरळी सी फेस, बॅण्डस्टॅन्ड, जुहू चौपाटी या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

नववर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी गर्दी; मध्यभागात कोंडी

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : नववर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. शहर, तसेच उपनगरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी आल्याने छत्रपती शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता तसेच परिसरातील गल्ली बोळात कोंडी झाली.

नववर्षाच्या पहिल्या दिवशी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात शहर, उपनगर तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. छत्रपती शिवाजी रस्त्यासह लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता, केळकर रस्ता परिसरात वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक (हुतात्मा चौक) दरम्यानचा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला होता. बाजीराव रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. दर्शनासाठी आलेल्या अनेकांनी मोटारी नदीपात्रातील रस्त्यावर लावल्याने नदीपात्रातील रस्त्यावरील मोटारींच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. मध्यभागातील गल्ली बोळात अनेकांनी दुचाकी वाहने बेशिस्तपणे लावल्याने कोंडी झाली होती. भाविकांची गर्दी रात्रीपर्यंत होती. शिवाजी रस्ता परिसरातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला होता.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने नूतन वर्षारंभानिमित्त आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिराच्या परिसरात रंगावलीच्या पायघड्या, तसेच पुष्प सजावट करण्यात आली होती. सकाळपासून मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, सारसबाग येथील सिद्धीविनायक मंदिर, तसेच शहरातील विविध मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

संपादकीय...

सं. 'मागा'पमानाची मौज!

...अमेरिकेतील या नाट्याची मौज घेतल्यानंतर आणि 'व्हिसा' मिळाल्यानंतर भावनिक मुद्द्यांवर अक्कल गहाण टाकायची नसते, याचेही भान भारतीयांना राखता आले तर बरे!गतवैभवाची भाषा जनसामान्यांस नेहमीच आकृष्ट करते. तथापि तसे करताना किती ताळतंत्र सोडायचा आणि शहाणपणापासून किती फारकत घ्यायची?राजकीय हिशेबासाठी शहाणपणा सोडून एक पाऊल मागे घेण्याचा लोकानुनय केला की नंतर अधिकाधिक मागेच जावे लागते. अमेरिकेचे माजी आणि भावी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांस आता याची जाणीव होत असणार. अमेरिकेस (पुन्हा एकदा) महान करण्याच्या वायद्यावर ट्रम्प गेल्या महिन्यातील निवडणुकीत विजयी झाले. ''देशास महान करीन'', ''गतवैभव मिळवून देईन'', ''पुन्हा एकदा सोन्याची कौले चढवीन'' वगैरे अजागळ घोषणांस लोक भुलतात. मग तो देश कोणताही असो. कारण भविष्य अज्ञात असते आणि वर्तमानाच्या अस्थिरतेत कथित उज्ज्वल भूतकाळाची पोपटपंची आशेचा किरण ठरते. बरे, हजारो वर्षांपूर्वीचा हा कथित उज्ज्वल भूतकाळ कोणी पाहिलेला आहे म्हणावे तर तसेही नसते आणि म्हणून विचारमंद जनसामान्य तो दंतकथा असूनही त्यावर विश्वास ठेवतात. राजकीय द्वंद्व म्हणजे या दंतकथांचा बाजार. या बाजारात शुष्क वास्तवावर शहाणे भाष्य करणाऱ्यांपेक्षा स्वप्नांचे खोटे इमले बांधणाऱ्याच्या उत्पादनांस नेहमीच अधिक मागणी असते. अमेरिकी निवडणुकीत त्याचा पुन्हा प्रत्यय आला. या निवडणुकीत 'मेक अमेरिका ग्रेट अगेन', म्हणजे 'मागा', हा जणू परवलीचा शब्द असल्यासारखे वातावरण होते. 'मागा'च्या टोप्या काय, टीशर्ट काय, पोस्टर्स काय सगळा नुसता हुच्चपणा! यातील एकालाही अमेरिकेस पुन्हा महान करावयाचे आहे म्हणजे नक्की काय हे विचारले असते तर सांगता आले नसते. या प्रश्नाचे उत्तर खुद्द ट्रम्प यांनाही देता येणार नाही. पण तरीही हे सर्व 'मागा'चे तुणतुणे वाजवत राहिले. आता ते अंगाशी येताना दिसते.हे होणारच होते. याचे कारण 'मागा' म्हणजे केवळ परदेशीयांना, स्थलांतरितांना हाकला यापेक्षा अधिक काही या मंडळींच्या डोक्यात नाही. आपल्या 'स्वप्नभूमीत' गौरेतर स्थलांतरित नको, असा या 'मागा'चा खरा अथ.र्तथापि या अर्धवटरावांस वास्तवाचे भान नाही. अमेरिका जी काही महान झाली/ होती वा आहे ती या स्थलांतरितांमुळे. या देशाचे नेतृत्व करणाऱ्यांत महान होण्याची क्षमता होती म्हणून जगभरातील स्थलांतरित त्याकडे आकृष्ट झाले आणि असे सर्व जगातील गुणवान आकर्षित झाले म्हणून तो देश इतका सशक्त झाला. हे स्थलांतर एके काळी अमेरिकेइतक्याच सशक्त असलेल्या सोविएत रशियात का नाही झाले? कारण तिथल्या देशनेतृत्वाची तितकी क्षमता नव्हती आणि नाही. त्यामुळे रशियात स्थलांतरितांविरोधात कोणी मोहीम हाती घेण्याची शक्यता नाही. हा फरक लक्षात घेताना या उभय देशांच्या नेतृत्वांतील साम्यस्थळही विचारात घ्यावे लागेल. हे साम्य आहे या दोन्ही देशप्रमुखांच्या भाषेत. ट्रम्प यांच्याप्रमाणेच पुतिन हेही रशियास पुन्हा गतवैभवी स्थानावर घेऊन जाऊ इच्छितात. तेव्हा मुद्दा हा की सच्ची लोकशाहीवादी अमेरिका असो वा अन्य कोणी वा रशिया. गतवैभवाची भाषा जनसामान्यांस नेहमीच आकृष्ट करते. तथापि तसे करत असताना किती ताळतंत्र सोडायचा आणि शहाणपणापासून किती फारकत घ्यायची याचे भान असावे लागते. ते नसले की काय होते याचे अमेरिकेत सध्या सुरू आहे ते उदाहरण. झाले असे की कोणा लॉरा लूमर या अलीकडे भलतेच फॅड असलेल्या 'इन्फ्लुएन्सर' महिलेने ट्रम्प यांनी श्रीराम कृष्णन यांच्या सल्लागारपदी केलेल्या नेमणुकीवर समाजमाध्यमांत हिणकस म्हणावी अशी टीका केली. हे श्रीराम अर्थातच भारतीय वंशाचे आहेत आणि ट्रम्प यांनी 'आर्टिफिशियल इंटलिजन्स' (कृत्रिम प्रज्ञा) विभाग हाताळण्यासाठी त्यांना सल्लागार घोषित केले आहे. त्यावर या लूमरबाई संतापल्या. ट्रम्प यांची ही कृती 'मागा' आश्वासनास तडा देणारी आहे असे त्यांचे म्हणणे. म्हणजे ट्रम्प यांनी सर्व महत्त्वाच्या पदांवर फक्त स्थानिक अमेरिकी व्यक्तींच्याच नेमणुका कराव्यात, स्थलांतरित अजिबात नकोत असा त्यांचा आग्रह. ट्रम्प हे उजवे तर लूमरबाई अतिउजव्या. ट्रम्प यांनी प्रचारात स्थलांतरितांविरोधात चालवलेला मुद्दा अमलात आणावा यासाठी त्या आग्रही आहेत. त्यांचा हा समाजमाध्यमी आग्रह 'मागा' समर्थकांत वाऱ्यासारखा पसरला आणि समस्त ट्रम्प समर्थकांस तो पटलादेखील. त्यामुळे ट्रम्प यांची चांगलीच पंचाईत झाली. कारण निवडणुकीत एखादा विषय तापवणे ही एक बाब आणि तो तापवलेला विषय तडीस नेता येणे ही वेगळी बाब. ट्रम्प यांना हा फरक लक्षात आला असणार. कारण त्यांनी अधिकृत स्थलांतरितांचे स्वागत करणाऱ्या 'एच १बी' व्हिसाची तारीफ केली. पण या 'मागा' समर्थकांस हे मंजूर नाही. आपल्या गेल्या अध्यक्षीय कारकीर्दीत आणि अलीकडे प्रचारात ट्रम्प यांनी स्थलांतरितांविरोधात कडक भूमिका घेतली होती आणि हे परदेशी घुसखोर स्थानिक अमेरिकनांची कुत्री-मांजरे खातात असा हास्यास्पद आरोप केला होता. गेल्या खेपेस ट्रम्प यांनी 'एच १बी' व्हिसासही विरोध केला होता. वास्तविक ट्रम्प यांचे लक्ष्य होते ते बेकायदा मार्गाने येणारे स्थलांतरित. 'एच १बी' व्हिसा घेऊन अमेरिकेत जाणारे हे कायदेशीर मार्गाने गेलेले असतात. पण हा फरक समजावून घेण्यास लूमरबाई तयार नाहीत आणि 'मागा' समर्थकांसही तो अजिबात मंजूर नाही. स्थलांतरित म्हणजे स्थलांतरित. कायदेशीर-बेकायदा असा फरक नाही; सगळ्यांना हाकला असा त्यांचा आग्रह. अमेरिकी उच्चतंत्र कंपन्या, बँका, वित्तसंस्था यांना हे झेपणारे नाही. कारण या सगळ्यात कळीच्या पदांवर अनेक परदेशी आहेत. त्यांचे प्रतिनिधित्व ट्रम्प यांचे सूर-साथी एलॉन मस्क यांनी आधी केले. मस्क हे 'एक्स' (आधीची ट्विटर) या कंपनीचे प्रमुख. त्यांच्या कंपनीत अनेक परदेशी नागरिक आहेत आणि खुद्द मस्क हेदेखील स्थलांतरितच आहेत. त्यांनी 'एच १ बी'चे समर्थन केले. झाले, 'मागा' समर्थक त्यांच्याही मागे लागले. परिस्थिती अशी झाली की अखेर ट्रम्प यांस मस्क यांच्या समर्थनार्थ मैदानात उतरावे लागले. त्यामुळे समाजमाध्यमी 'मागा'पंथी अधिकच चिडले. त्यांचा तो अवतार पाहून मस्क यांनाही आपल्या भूमिकेत बदल करावा लागला. 'एच १बी'चा पुनर्विचार व्हायला हवा; त्यात अनेक दोष आहेत, असे आता हे मस्क महाशय म्हणतात. परिणामी या मुद्द्यावर ट्रम्प एकटे पडले.हा जगाचा इतिहास आहे. भावना उद्दीपित करून निवडणुका जिंकल्या, सत्ता मिळवली की या भावनांस आळा घालावा लागतो. परंतु एव्हाना हे भावनोद्दीपित चेकाळलेले असतात. आपल्या भावनांस ज्यांनी हात घातला त्यांचे शांत होणे त्या सर्वांस मंजूर नसते. ते मग आपल्याच नेत्यांच्या कह्यात राहत नाहीत. मग मुद्दा मशिदींखालील शिवलिंगांचा असो वा स्थलांतरितांस हाकलण्याचा. दोन्ही भिन्न भौगोलिक मुद्द्यांवरील प्रतिक्रियेत साम्य असते. तेव्हा अमेरिकेतील या 'संगीत 'मागा'पमान' नाट्याची मौज भारतीयांनी मनःपूर्वक घ्यायला हवी. कारण या 'एच १बी' व्हिसाचा सर्वाधिक फायदा भारतीय उठवतात. म्हणजे दर दहा 'एच १बी' धारकांतील तब्बल सात व्हिसाधारी 'भरतभू'त जन्मलेले असतात. या नाट्याची मौज घेतल्यानंतर आणि 'व्हिसा' मिळाल्यानंतर भावनिक मुद्द्यांवर- मग तो मायदेशातील मंदिर-मशिदीचाही का असेना- अक्कल गहाण टाकायची नसते, याचेही भान राखता आले तर बरे! तसेही अमेरिकावासी भारतीयांचा आविर्भाव आपले भारतावर भारतीयांपेक्षा अधिक प्रेम आहे, असा असतो! त्यांच्यासाठी हा सं. 'मागा'पमानाचा प्रयोग अधिक रंगतदार असेल.

नववर्षाची प्रतिक्षा: गुप्त पाटीची अपेक्षा!

१ जानेवारी: नुतनवर्ष, विश्व धुम्रपानविरोधी दिन व म.फुले दांपत्य सन्मान दिन विशेष



WORLD NO SMOKING DAY

तंबाखूचे खैनी, चैनी, गड्डू, गुटका, गुडाकू, जर्दा, तईबूर, स्नफ इत्यादीच्या रूपात सेवन होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाण्याने इतरांना फारसा त्रास होत नाही. मात्र, सिगारेट, विडी, सिगार, पाईप्स, हुक्का, चिलीम, हुकलीस, चुट्टा, चिरुट इत्यादीने परिसरातील इतर व्यक्तींना त्रास होतो. शरीरात धुराने प्रवेश केल्याने न ओढणारेही अप्रत्यक्षपणे धूम्रपानाचे बळी ठरतात. यामुळेच नववर्षाच्या आरंभी धुम्रपानास विरोध हा झालाच पाहिजे. म.फुले दांपत्यांनी दिलेले शिक्षण सुसंस्कारमय होते, हे त्यातून दिसेल आणि हाच त्यांचा मोठा सन्मान ठरेल. श्री कृष्णकुमार जी.निकोडे गुरूजींचा हा डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा लेख... संपादक.

संपूर्ण जगावर इंग्रजीचे सर्वाधिक प्राबल्य आहे. त्यामुळे साहजिकच १ जानेवारी हा दिवस नववर्षारंभ म्हणून धुमधडाक्यात त्याचे स्वागत होत आहे. महाराष्ट्रात म.फुले सन्मान दिन साजरा करण्यात येतो. कारण याच दिवशी कामगार बंधूंनी त्यांना महात्मा ही पदवी देऊन गौरविले होते. म्हणून तो दिवस उजाडण्याची अनेक दिवसांपासून प्रतिक्षा केली जाते. त्याबरोबरच याच नुतनवर्ष आरंभदिनी पार्टी करून नव्या वर्षाच्या तोंडावर पान खाऊन कसे थुंकता येईल? याचे मनसुबे रचले जातात. तशी मनोमन अपेक्षा बाळगली जाते. त्यामुळे वर्षारंभ लक्षात घेऊन जागतिक धुम्रपानविरोधी दिन पाळण्यात यावा, असेही ठरविले गेले. मात्र याकडे कानाडोळा केला जातो. संकल्प तर भरमसाठ आणि अशक्यप्राय केले जातात. डोंगर, चंद्र, मंगळ, समुद्र, आकाशात बंगला बांधेन, अमुक धरेन, तमुक सोडेन. मात्र धुम्रपान विरोधावर ब्र शब्दही उच्चारणार नाही. म.फुले दांपत्याने बहुजनांसाठी याच दिवशी शाळा उघडली. म्हणून महाराष्ट्रात हाच दिवस म.फुले दांपत्य सन्मानदिन साजरा केला जातो. एकीकडे सुशिक्षितांची संख्या वाढली. त्याच्या समप्रमाणात वाईट व्यसनांधांची संख्याही फोफावली. हेच धुम्रपान- व्यसनांचे व्यस्तप्रमाण असावयास हवे होते. शिक्षणामुळे मती प्रकाशली, गुलामगिरी उधळून लावली व नवे-जुने कळू लागले. पण व्यसने-धुम्रपानाचे प्रमाण का वळू शकत नाही? स्वतःसह प्रियजनांच्या व इतरांच्याही आरोग्याचे वाभाडे निघाले. कसे का? याचे आत्मपरीक्षण व आत्मचिंतन होणे अत्यंत गरजेचे आहे.

सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना, कामाच्या ठिकाणी आणि घरातील सदस्यांजवळ धूम्रपान केल्यास त्याच्यातील विषारी रासायनिक घटकांमुळे कर्करोग होण्याचा संभव अधिक असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तंबाखू सेवनामुळे हृदय विकार, फुफ्फुसाचा कर्करोग, गुंतागुंतीचे फुफ्फुसाचे आजार, क्षयरोग, स्ट्रोक, श्वसन संस्थांचे आजार होतात. यापैकी ४० टक्के आजार हे धूम्रपानाशी संबंधित आहेत. महिलांच्या धूम्रपानामुळे वेगवेगळी गुंतागुंत निर्माण होते. गर्भधारणेशी संबंधित गुंतागूंत, अपुऱ्या दिवसांची प्रसूती, कमी वजनाच्या बाळाचा जन्म इत्यादी. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम माहिती असतानाही आजही भारतात २४.३ टक्के भारतीय पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. केरळमधील काही गावांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत लहान मुलांद्वारे तंबाखू देऊन केले जाते. भारतातील काही विशिष्ट भागातील कुटुंबातील लग्न समारंभात पाहुण्यांना तंबाखू देऊन सन्मान करण्याची प्रथा आहे. मिझोरमच्या ग्रामीण भागात स्वागत करण्याची ताइबूर ही प्रथा तंबाखू देऊनच साजरी केली जाते.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

तंबाखू सेवनाने तोंडाचा कर्करोग होण्याच्या दाट शक्यतेसह इतर आजारही बळावत आहेत. याबाबत जनजागृती होत असतानाही देशात २४.३ टक्के पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. दरवर्षी १ जानेवारी हा जागतिक धूम्रपान विरोधी दिन म्हणून पाळला जातो. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम दिसत असतानाही गेल्या कित्येक वर्षांपासून भारतीय माणसाच्या जगण्याशी आणि संस्कृतीशी जुळलेल्या तंबाखूला प्रतिबंध करणे शक्य झालेले नाही. तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून आले आहे. तंबाखूमध्ये जवळपास चार हजार रसायने आढळतात. त्यात कमीत कमी २०० विषारी घटक आहेत. जे निकोटीन, कार्बन मोनोक्साईड, टार, अर्सेनिक, फॉर्मल्डिहाईड इत्यादींचा विषारी घटकांमध्ये समावेश होतो. तंबाखू खाण्यास वा धुम्रपानाची सवय जडण्यास कुटुंबातील वडीलधारी व्यक्तींचादेखील परिणाम होतो. याशिवाय समवयस्कांचा प्रभाव, प्रयोग करून पाहणे, मतांचा प्रभाव, उत्सुकता, फिल्मी कलाकारांचे अवलोकन व नक्कल, चित्रपटातील मॉडेल्स, जाहिरातींचा प्रभाव, स्वतःचे मन शांत करण्यास, जल्लोस व आनंदोत्सव साजरा करण्यास, जागरुक राहण्यास, ताजेतवाने वाटण्यास, थाडस वाढवण्यास, कामाची क्षमता वाढवण्यास, विरंगुळा, टाइमपास आणि मानसिक आरोग्यासाठी तसेच निष्काळजी प्रवृत्ती असल्यास तंबाखूचे सेवन किंवा धुम्रपान केले जाते.

भारतात १० पैकी सात स्मोकर्सना धूम्रपान धोकादायक आहे, याची जाणीव असते. ५३ टक्के लोक धूम्रपान सोडण्यास असमर्थ आहेत, अशी फाऊंडेशन फॉर अ स्मोक-फ्री वर्ल्डने प्रसारित केलेल्या माहितीतून हे सत्य उघड झाले आहे. भारतात दर दिवशी १०४ दशलक्षाहून अधिक लोक तंबाखू सेवनामुळे आपल्या आरोग्याशी खेळत असतात. देशात रस्त्यारस्त्यांवर हाताने वळलेल्या विड्या क्षुल्लक किमतीत उपलब्ध असतात. या प्रकारामुळे भारतात मोठ्या प्रमाणात तंबाखू सेवन चालते. हा पारंपरिक सिगरेट प्रकार भरपूर लोकप्रिय असून त्यांच्यावर कराचा भार नाही. त्यामुळे भारतासारख्या देशात इतर देशांच्या तुलनेत तंबाखू नियंत्रणाचे निराळे पर्याय राबवून तंबाखू विरामाला चालना देऊन धोके कमी केले पाहिजेत. आपण म.फुले दांपत्य सन्मान दिनाचे स्मरण ठेवून नववर्षारंभी विश्व धुम्रपान विरोध केले, तर मोठ्या कौतुकास पात्र ठरू शकतो.

!! सर्वांत सुमती निर्माण होणेस्तव नववर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

नव कॅलेंडर...

झळकलं भिंतीवर
नवीन कोरं कॅलेंडर
जुन बिचारं लगेचं
रद्दीत झालं सरेंडर

विचार करी ते जुने
वर्षसंपले हे लवकर
कालचक्र हे चालते
इथेकाही ना स्थावर

सर्वांचेलक्ष मजकडे
मी चालू होतो तोवर
पहायचे कौतुकाने
ताजा तवाना जोवर

कुरवाळे सान थोर
पाहती सारे वारंवार
ठरवी कार्यक्रम ते
कधीकुठले सणवार

कुटूंबाचा वाटे भाग
अप्रूप ते अपरंपार
कळले सत्य उशीरा
हा केवळ व्यापार

पडे जाऊन रद्दीत
कचरा झालाय पार
कळलाकाळ महिमा
माणसा तुझे आभार

आले दिवस नव्याचे
लावा छान कॅलेंडर
महिमा हा काळाचा
स्वागत करू तोंडभर

--हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

बाय बाय...

भराभर दिस
सरले
जुन्या वर्षाला टाटा
नव वर्षाचे स्वागत
सुहास्य वदने भेटा

कसे असेल नवं वर्ष
मनात उसळे लाटा
कसा असे मार्ग नवा
कुणीकडे नेती वाटा

मागचे साल विचीत्र
निसर्गाची क्रूर थट्टा
दहावर्षे मागे फेकले
जोरदार बसला रट्टा

अर्थव्यवस्था तुटली
भरपूर झाला घाटा
निसर्गाचा कोप होई
बळीराजाच्या पोटा

काळाशी जुगार करे
आयुष्यभराचा सट्टा
नेत्यांचा वाद विवाद
रंगला गप्पाचा कट्टा

ईडीसिबीआय यांचा
बसला कसला सोटा
सेलिब्रिटी करी पार्टी
खट्टा गरिबांचे पोटा

झाले गेले गंगार्पण
रे पुढची पाने उलटा
उमेदीने उभे राहूनि
नशीबा भले पलटा

--हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

मंगलमूर्ती विद्याधाम प्रशालेत माजी विद्यार्थ्यांचा दोन दशकानंतर मेळावा संपन्न

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : शिरूर तालुक्यातील रांजणगाव गणपती येथील मंगलमूर्ती विद्याधाम प्रशालेत रविवार दिनांक २९ डिसेंबर रोजी आठवणींना उजाळा देण्यासाठी तत्कालीन दहावीत असणाऱ्या बॅचच्या विद्यार्थ्यानी एकत्र येत गेट टूगेदर घेतले. 'नाते मैत्रीचे आणि हृदय संवादा'चे या शीर्षकाखाली मंगलमूर्ती विद्याधाम प्रशाला रांजणगाव गणपती येथील २००४-०५ च्या दहावी बॅचचा स्नेहसंमेलन मेळावा प्रशालेतील प्रांगणात पार पडला. या मेळाव्यात एकूण ७० माजी विद्यार्थी विद्यार्थिनींनी हजेरी लावली होती.

शाळेतील धमाल, मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला.या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते. पुणे जिल्ह्याच्या रांजणगाव गणपती येथील मंगलमूर्ती विद्याधाम प्रशालेतील इयत्ता दहावी २००४-०५ वर्षातील तत्कालीन विद्यार्थ्यांनी हृदय संवाद या शीर्षकाखाली मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात अनेक शिक्षकांनी हजेरी लावली यात प्रामुख्याने तुकाराम फंड, निळकंठ जोशी, वसंत औटी, पद्माकर खणगे, अशोक शेळके, रामदास शिंदे,सुनंदा भोगावडे, नंदकुमार अनारसे, दत्तात्रय भुजबळ, गणेश वेताळ, मच्छिंद्र बनकर, ब्रिजेशकुमार मकर, वंदना रासकर आदी शिक्षक आणि शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्र या विषयाचे तज्ञ अध्यापक दत्तात्रय भुजबळ सर होते.

स्नेहमेळाव्याची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर माजी विद्यार्थी अतुल जगदाळे यांनी प्रास्ताविक केले असून सूत्रसंचालन भारती पाचुंदकर व विलास बत्ते या विद्यार्थ्यांनी केले. २००४-०५ च्या बॅच मधील मित्र-मैत्रिणी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात येऊन तब्बल २० वर्षांनी एकत्र येण्याचे ठरले. माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा हृदय संवाद मेळावा घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न उद्योजक सागर लांडे, गौतम पवार, महावीर कटारिया या तिघांनी सर्व विद्यार्थ्यांना संपर्क करून एकत्र करण्याचे काम केले.

हृदय संवाद मेळावा उत्साहात साजरा करत असताना विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली. डॉ.अजित लांडे (लांडे हास्पिटल), डॉ.तुषार पाचुंदकर (देवस्थान सचिव), उद्योजक गोरक्ष बत्ते ,अजित बडदे (एक्साईज सब इन्स्पेक्टर),धनंजय खेडकर (गाडामालक),विजय खेडकर (हॉटेल विजयवाडा), सुनिल पवार, रामदास खेडकर, दिपाली शरद बत्ते, प्रिया दाते, प्रियांका सोनवणे, चैताली भुजबळ, वृषाली गदादे, संदेश खेडकर, नम्रता गदादे, योगेश कोल्हे, दिनेश शेळके, सुभाष नरवडे, विनायक खेडकर, सुहास बांदल, अमोल पाचुंदकर, दीपक शेळके, बाबुराव लांडे, विकास दाते, संदीप शेळके, अविनाश कोल्हे, प्रिती कटारिया, प्रियांका बत्ते, कविता कुटे, योगेश फंड यांनी मनोगतातून सर्व उपस्थितांची मने जिंकली. दुःखित अंतःकरणाने आपल्यात नसणाऱ्या शिक्षकांना काही क्षण मौन पाळून विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली वाहिली.

विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षकांना कार्यक्रमाच्या निमित्ताने सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले व माजी विद्यार्थ्यांना स्पेशल रिटर्न गिफ्ट देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी सहा मोठे डिजिटल फलक भेट म्हणून देण्यात आले.विद्यमान मुख्याध्यापक सुनिल थोरात यांनी माजी विद्यार्थ्यांची प्रशालेच्या वतीने दिलेल्या भेटीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आकाश साळुंके यांनी विशेष सहकार्य केले.सर्वात शेवटी अभिजीत खेडकर यांनी आभार मानले व पसायदान घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

माळेगावच्या खंडेराय यात्रेला ३०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा !

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : दक्षिण भारतात सुप्रसिद्ध व सर्वदूर परिचित आणि लाखो भाविक-भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र माळेगावच्या खंडेराय यात्रेला सुमारे ३०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात सुप्रसिद्ध असे माळेगाव श्रीक्षेत्र असून ही पावन भूमी श्री खंडेरायांयाच्या पवित्र स्थानामुळे पुनीत झाली आहे. लाखो भाविक-भक्तांचे ते नवसाला पावणारे भक्तीमय स्थान भक्तांच्या ठायी ठायी भिनले गेले आहे. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर लगतचे कर्नाटक, आंध्रा, तेलंगना, गुजरात, मध्यप्रदेश आदी राज्यांमधून लाखो भक्तांची अगदी भक्तीभावाने प्रतिवर्षी रिघ लागलेली असते. हजारो भक्तांच्या नवसाला पावणाऱ्या या खंडेरायाच्या यात्रेत सहभागी यात्रेकरुंचा कमालीचा जल्लोष, उत्साह अगदी शिगेला पोहोचला जातो.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी माहे मार्गशीर्ष, वद्य एकादशी, रविवार, दि.२९ डिसेंबर २०२४ रोजी या यात्रेला मोठ्या थाटामाटाने प्रारंभ झाला आहे. श्री खंडेरायाचे हेमाडपंथी स्थापत्य शैलीचे पुरातन मंदिर आहे. मंदिराला दगडी महाद्वार आहे. त्याला लागूनच एक बुरुज आहे. मंदिराच्या सभामंडपात मध्यभागी दगडी ओट्यावर मणी मल्लासुराचे दगडावर? कोरलेले मुखवटे आहेत. गाभाऱ्यात एका आयताकृती दगडी उंच ओट्यावर श्री मल्हारी व म्हाळसा यांचे मुखवटे आहेत. निजाम राजवटीत याच मंदिराची व्यवस्था परगण्याची जबाबदारी राजे गोपालसिंग कंधारवाला व त्याचा पुत्र तथा कंधारचा किल्लेदार अजयचंद यांच्याकडे होती. याच श्रीक्षेत्राची विधीवत धार्मिक पूजाअर्चा करुन जल्लोषात निघालेल्या देव स्वारीच्या पालखी सोहळ्यात सहभागी लाखो भक्त बेल-भंडार आणि खोबऱ्याची उधळण करतांना दिसून आले. लाखो भक्तांची दर्शनासाठी अभूतपूर्व अशी गर्दी उसळली होती. लोहा तालुका प्रशासन, नांदेड जिल्हा परिषद प्रशासन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त पुढाकाराने पालखी सोहळ्याच्या स्वागत करण्यात आले. त्याशिवाय यात्रेदरम्यान संपूर्ण धार्मिक सोहळ्याचे नियोजन अगदी कटीबद्धरित्या करण्यात येत असते.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, जागतिक अर्थतज्ज्ञ तथा ज्यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा तब्बल दहा वर्षे एकाग्रतेने सांभाळली, ते सन्माननीय श्री.मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे शोक व्यक्त करण्यात येऊन देशभर सात दिवसाचा दुखवटा पाळण्यात आला. त्यामुळे सदर सोहळासमयी नियोजित शासकीय कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले. स्थगित करण्यात आलेले नियोजित कार्यक्रम गुरुवार, दि.२ जानेवारीपासून विधीवत पूजनाने पार पाडले जाणार आहेत. आगामी ५ जानेवारी पर्यंत ही यात्रा सुरु असते. रविवारच्या सोहळ्यासमयी पालखी मानकऱ्यांचा यथायोग्य सन्मान करण्यात आला. पालखी सोहळा समयी पारंपारिक वेशभूषा परिधान करुन वाघ्या मुरळी लांब कवड्यांच्या माळा घालून कपाळी ला मोठा भंडाऱ्याचा मळवट भरुन चाबकाचे फटके घेत सामील झाले होते. तर, वासुदेव आपल्या अंगावर सदरे व डोक्यावर मोरपिसांचे मोठमोठे टोप घालून पारंपारिक वेशभूषेत आपला आविष्कार प्रदर्शित करीत होते.

देशपातळीवरील विविध मानव जातींबरोबरच अनेक प्रकारचे पशू खरेदी-विक्रीसाठी या यात्रेत हजारोंच्या संख्येने येत असतात. या यात्रेत लावणी, वाघ्या मुरळीची गाणी, आराध्याची गाणी, वारु नाचविणे, आराध्याची गाणी, ढोलकी, फडाच्या तमाशाचे खेळ, संगीत-बारी, याशिवाय बहुरुपी रायरंद, वासुदेव, स्मशान जोगी, मरीआईवाले अशा विविध लोककलावंतांचे नृत्याविष्कार प्रदर्शित केले जातात. माळेगावपासून १५-२० कि.मी.अंतरावर असलेल्या रिसनगावचे भूमीपुत्र नागोजी नाईक हे श्री खंडेरायाचे निस्सीम भक्त होते. त्यांनी इ.स.१८०९ मध्ये निजामाशी बंडखोरी केली म्हणून कंधार येथे पकडून तेथेच तोफेच्या तोंडी दिले होते. वेषपरंपरेने नाईक घराण्याकडेच श्री खंडेरायाच्या पालखीचा मान होता व आजही आहे. तर, कंधार लगतच्या भोसी येथील वाणी-पाटील घराण्याकडे खंडोबाच्या पागोट्याचा मान आहे. या जत्रेत सर्व प्रकारच्या पशूंची विशेषतः घोडे, वराह आदींची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात होत असते. त्याशिवाय शर्यती, प्रदर्शन, कुस्त्यांची दंगल, लोककला, संगीत वाद्य, लोकनाट्य असे विविध कार्यक्रम स्थानिक समितीच्या सहकार्याने आयोजिले जातात. पूर्वी हीच यात्रा तीन तीन महिने चालत असे. परंतु आता ती केवळ पाच दिवसासाठीच असते. या व्यतिरिक्त लहान लहान मुलांसाठी करमणूकीचे साधन म्हणून आकाश पाळणे, घोडा गाड्या, फिरती चक्र, उड्या मारणे आणि खेळाच्या साहित्यांची कटलरी दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली जातात. या निमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमासाठी राजकीय, सामाजिक नेते, मंत्री, खासदार, आमदार तथा अन्य लोकप्रतिनिधी, शासकीय, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आदींची मांदियाळी असते. सुमारे ३०० वर्षांपासून सुरू असलेली या ऐतिहासिक श्रीक्षेत्र खंडेरायाच्या सोहळ्याची व यात्रेची परंपरा अल्पकाळ का असेना परंतु आजही कायम टिकून आहे हे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

विघ्नहर कारखान्याची निवडणूक शेतकरी संघटना लढणार जिल्हा संघटक अंबादास हांडे

जुन्नर ■ सचिन थोरवे



जुन्नर : शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर काल १४ नंबर या ठिकाणी पत्रकार परिषदेचे शेतकरी संघटनेच्या वतीने आयोजन करण्यात आले होते यावेळी पत्रकारांनी शेतकरी संघटनेचे जिल्हा संघटक अंबादास हांडे यांना विघ्नहर कारखाना च्या निवडणुकीविषयी माहिती विचारली असता त्यांनी जुन्नर आंबेगाव तालुक्यातील शेतकरी आणि शेतकरी संघटना ही निवडणूक शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणार असल्याचे सांगितले.

आयोजित पत्रकार परिषदेत प्रीपेड मीटर शेतकऱ्याच्या दुधाला मिळत असलेला कमी बाजार त्याचप्रमाणे तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील शेतकरी सस्ते यांचे आत्महत्या त्याचप्रमाणे सोयाबीनला हमी बाजार खतांच्या वाढत्या किमतीवर नियंत्रण जुन्नर नगरपालिकेच्या हद्दीतील दुर्गंधीयुक्त सांडपाणी कुकडी नदी त आल्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न त्याचप्रमाणे बिबट हल्ल्यात प्रतिमुखी पडलेल्या नागरिकांना वनविभागृह मिळत असलेली तुटपुंजी आर्थिक नुकसान भरपाई त्याचप्रमाणे मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांना विधानसभेपूर्वी कर्जमाफीचे दिलेले आश्वासन पाळावे असे अनेक विषय त्या ठिकाणी घेण्यात आले.

ऊस तोडणी हंगाम उशिरा सुरू झाल्यामुळे ऊस १८ ते १९ महिन्याचे झाले असल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात घट त्याचप्रमाणे नवीन मिलचे काम चालू असल्याने ऊस तोडणीचे प्रोग्रॅम नियोजन शून्य असल्याबद्दल त्याचा शेतकऱ्यांना जास्त प्रमाणात तोटा सहन करावा लागत आहे त्याबद्दल शेतकरी नेते अंबादास हांडे यांनी नाराजी व्यक्त केली.

येणाऱ्या आगामी काळात शेतकरी संघटना स्वबळावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील लागणार असल्याचे हांडे यांनी सांगितले.

यावेळी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते जिल्हा संघटक अंबादास हांडे तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संजय भुजबळ उपाध्यक्ष अजित दादा वाघ अखिल भारतीय शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रमोद खांडगे मनसेचे शेतकरी नेते योगेश तोडकर त्याचप्रमाणे जुन्नर तालुका शेतकरी संघटनेचे युवा अध्यक्ष सचिन थोरवे बाळासाहेब काकडे हे यावेळी उपस्थित होते.

सरत्या वर्षाच्या सांजवेळी विद्या प्रतिष्ठानच्या गदिमा सभागृहामध्ये मराठी माध्यमिक शाळेचा रंगला विविध गुणदर्शन सोहळा

सातारा ■ अर्चना जगताप



सातारा: सरत्या वर्षाच्या सांजवेळी विद्या प्रतिष्ठान मराठी माध्यमिक शाळेमध्ये रंगला विविध गुणदर्शनाचा सोहळा. विद्या प्रतिष्ठानच्या गदिमा सभागृहामध्ये विद्यालयाच्या ३२ व्या विविध गुणदर्शन कार्यक्रमा निमित्त पुणे जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी मा. भाऊसाहेब कारेकर, बारामतीचे गटशिक्षणाधिकारी निलेशजी गवळी , संस्थेचे सदस्य मा. डॉ.राजीव शहा, संस्थेचे रजिस्ट्रार मा. श्रीश कुंभोज, स्क्वाड्रन लीडर मा. सुजय यादव, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सौ. निर्मला राऊत, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मा. श्री. मारुतीराव काटे, सहसचिव सौ. पद्मजा राजेभोसले, असंख्य पालक वर्ग आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयातील २२४६ विद्यार्थ्यांची ०६ कुलांमध्ये विभागणी केल्यानंतर ५३७ विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या अंगी असलेल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यामध्ये गणेश वंदना, शेतकरी जीवन, अजय अतुल यांचा जीवनपट, देशभक्तीपर गीतांचा नृत्याविष्कार, महाराष्ट्राची लोकधारा, रील आणि रियल यातील वास्तव अशा विषयांवरती विद्यार्थ्यांनी नृत्य-नाट्य सादर केली. या सर्व कार्यक्रमांचे परीक्षण सीने अभिनेते श्री. अशोक भिसे, श्री. विनोद वनवे, मास्टर इम्रान यांनी केले. त्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकही घोषित करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रकाश यादव यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यालयाची सविस्तर माहिती दिल्यानंतर संस्थेचे सदस्य मा. डॉ. राजीव शहा यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा करीत असलेले प्रयत्न, वेगवेगळ्या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर मिळवलेली बक्षिसे, वर्षभरात विद्यालयास मिळालेले विविध सन्मान यांचा उल्लेख करून विद्यालयाचे कौतुकही केले. भविष्यामध्ये विद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होवो व आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशात आणि जगामध्ये नावलौकिक करून संस्थेचे नाव मोठे करावे.अशा हार्दिक शुभेच्छा ही दिल्या.

विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम पाहून शिक्षणाधिकारी मा. श्री. भाऊसाहेब कारेकर यांनी विद्या प्रतिष्ठान सारख्या संस्थेमध्ये येऊन विद्यालयाची पाहणी करण्याचे व उपक्रम अनुभवण्याचे सौभाग्य आपणास प्राप्त झाले व बारामतीतील विद्यालयांची पाहणी या शाळेपासून सुरू झाली याचा मला आनंदही झाला अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या.

स्नेहसंमेलना निमित्त विद्यालयांमध्ये ९ डिसेंबर पासून मैदानी क्रीडा स्पर्धा, तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा, वयक्तिक नृत्य स्पर्धा, गीत गायन, आजी आजोबा सन्मान सोहळा, वैयक्तिक गीत गायन स्पर्धा, वेशभूषा, कथाकथन, वादविवाद, परिपाठ पाठांतर स्पर्धा, रांगोळी, छंद, पुष्परचना स्पर्धा व आनंद मेळावाही आयोजित करण्यात आला होता. हे सर्व विविध कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रकाश यादव, उपमुख्याध्यापक श्री. प्रकाश कोरे, पर्यवेक्षक श्री. नानासाहेब रकटे, श्री.हरिभाऊ गोसावी, स्नेहसंमेलन प्रमुख श्री. प्रकाश कुंभार, सौ. प्राची राजोपाध्ये. सर्व कुलांचे कुलप्रमुख. यांनी नियोजनपूर्वक कार्यक्रमाची आखणी केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अजिनाथ घोरपडे यांनी केले.

वाचनाने माणूस समृद्ध होतोः शेख शफी शेख मगदूम

कंधार ■ माधव गोटमवाड



कंधार : दि ०१ जानेवारी रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने विचार विकास मंदिर वाचनालय कंधार येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन शेख शफी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संजय कांबळे, माधव तांबोळी ,व वाचनालयाचे अध्यक्ष मारोती पंढरे यांची उपस्थिती होती. यावेळी शेख सर म्हणाले की वाचनालय व वाचन हे माणसाच्या आयुष्यात आले तर माणूस वाचनाने समृद्ध होतो .त्यामुळे माणसाला कोणाकडेही हात पसरण्याची गरज पडत नाही. त्यानिमित्य वाचनालयामध्ये स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आलेले आहे .उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या आदेशाने सामूहिक वाचन, वाचन कौशल्य, कार्यशाळा, वाचन संवाद व पुस्तक परीक्षण कथन इ.स्पर्धा ०१ ते १५ जानेवारीच्या दरम्यान कंधार येथील विचार विकास मंदिर वाचनालयामध्ये आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व वाचन प्रेमींनी याचा लाभ घ्यावा असे वाचनालयाचे अध्यक्ष ?ड.मारोती पंढरे यांनी केले आहे. यावेळी वाचनालयाचे नियमित वाचक शेख पठाण ,मोसिन कुरेशी ,ओम सूर्यवंशी, अविनाश सूर्यवंशी ,शेख फारुख, चांद साब मामू , नरेश कल्लेपूरवार, इत्यादी वाचक वर्ग उपस्थित होता. वाचनालयात स्पर्धा परीक्षा ग्रंथांचे प्रदर्शननाचे आयोजन करण्यात आलेले असून ते दि ०१ जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत असणार आहे तरी वाचक प्रेमींनी याचा लाभ घ्यावा असे ग्रंथपाल जगदीश धोंड व विजय जयराम बोधनकर यांनी केले आहे.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल जगदीश धोंड यांनी केले तर आभार स. ग्रंथपाल विजय बोधनकर यांनी मानले.

कामठी येथे ज्येष्ठ शिक्षकांचा सत्कार

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : बालाजी सभागृह कामठी येथे कामठी शाखेच्या सौजन्याने संघटनेच्या जिल्हा शाखेची त्रैमासिक सभा जिल्हाध्यक्ष अशोकराव दगडे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली त्यानंतर श्रीमती दिक्षा चनकापूरे सभापती पंस कामठी यांचे अध्यक्षते खाली कामठी येथील ज्येष्ठ शिक्षकांचा अमृत महोत्सवी सत्कार समारंभ संपन्न झाला. या सभेला संघटनेचे सर्व वरीष्ठ पदाधिकारी व्यासपिठावर उपस्थित होते . सत्कार समारंभाला नागपूर जिप चे मुख्य लेखाधिकारी श्री जितेंद्र राउत व उप लेखाधिकारी श्री मोटघरे उपस्थित होते . सुत्रबद्ध नियोजन व उत्कृष्ठ व्यवस्था होती. संघटनेच्या सर्व विषयावर विस्तृत चर्चा झाली. ३०० लोकांची उपस्थिती हे या समारंभाचे वैशिष्टय होते . आमसभेचे सुत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस दिपक सावळकर व संपूर्ण सत्कार समारंभाचे सुत्रसंचालन जिल्हा कार्यालय सचीव श्री रामभाउ ठाकरे यांनी केले . या प्रसंगी सर्व तालूका सचिवांनी आपापल्या तालूका शाखांचे अहवाल सादर केले . नियोजीत विषयांप्रमाणे सर्व विषयांवर सखोल चर्चा झाली . याप्रसंगी व्यासपिठावर साहेबराव ठाकरे विनोदराव राउत. पत्रकार प्रा सुनील मोहोड भीमराव बेले मालतीलाई आगरकर शेषराव घुगल दिपक तिडके रामदास किटे शेषराव खंडार . ज्ञानेश्वर वानखेडे . प्रभाकर लांजेवार ?ड बोकडे . जयदेव टाले सुधाकर भूरके . संजय भेंडे चिमुरकर . इत्यादी सर्व वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते .

पुण्यातील प्रसिद्ध अभिनेत्री स्वाती हनमघर यांचा खास जीवन प्रवास

सातारा ■ जीवन मोहिते



सातारा: माझा जन्म पुण्यात झाला. बालपण शुक्रवार पेठ मध्ये गेलं. तशी आमची परिस्थिती मध्यम वर्गीय होती आम्ही तीन बहिणी ,माझं शिक्षण पहिली ते दहावी जिजामाता मुलींचे हायस्कूलमध्ये झालं गरवारे कॉलेजमध्ये ग्रॅज्युएशन पूर्ण केलं लहानपणापासूनच कलेची आवड होती शाळेत असताना मी सर्व स्पर्धेमध्ये मध्ये भाग घ्यायची कॉलेजमध्ये असताना पुणे फेस्टिवल मध्ये भाग घ्यायचे कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाल्यावर लग्न झाले सासरची परिस्थिती खूप चांगली होती लग्नानंतर काहीतरी व्यवसाय करण्याची मनात जिद्द , होती म्हणून स्वतःची एक ओळख निर्माण व्हावी म्हणून कम्प्युटरचा डिप्लोमा कोर्स पूर्ण केला तसेच सलोन बाबतचे सर्व कोर्स पूर्ण केले व परिक्षा दिल्या तसेच पुण्यातील सिंहगड रोड येथे स्वेव्ह युनिसेक्स सलोन चालू केले स्वेव्ह युनिसेक्स सलोन सांभाळताना घरात दुर्लक्ष न करता घर संसार व मुलं बाळ सांभाळत स्वेव्ह युनिसेक्स सलोन चालवत होते मग जसजशी मुलं मोठी होत गेली तसतशी माझी जबाबदारी कमी होत गेली त्यामुळे स्वेव्ह युनिसेक्स सलोन कडे मला जास्त वेळ देता आले तसेच स्थानिक लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत गेला

मला लहानपणापासून सिनेमा क्षेत्रात जाण्याचे आवड होती मला संगीत मराठी चायनल ने त्यांच्या अल्बम सॉग साठी मला पहिली संधी दिली तेथून सिनेमा क्षेत्रात करिअरची सुरुवात झाली मी पहिला सिनेमा अमोरे केला तसेच शॉर्ट फिल्म केले मी बेहेरोज बिर्याणी, तल्ला ज्वेलरी, मलबार गोल्ड ज्वेलरी, असे अनेक शॉर्ट फिल्म केले तसेच खूप कमी वेळात नॅशनल लेव्हलवर पोहोचले त्यामुळे वीया मिसेस इंडिया हा किताब व क्राऊन मला मिळाला नॅशनल लेव्हलवर अनेक मिसेस सौंदर्यवती स्पर्धेमध्ये भाग घेतला व त्यामध्ये मी जिंकले त्यामुळे मला इंटरनॅशनल अवॉर्ड प्रदान करण्यात आला. तसेच व्यावसायिक व सामाजिक कार्यामध्ये सुद्धा पुरस्कार मिळत गेले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रहिमतपूर यांच्या विद्यमाने नवीन वर्षाचे आगमन हे दारू न पिता दूध पिऊन उपक्रम

खाटाव ■ मेहमुद्दीन शेख



सातारा खटावः रहिमतपूर हा उपक्रम गेली पंधरा वर्ष संपूर्ण महाराष्ट्रभर संघटनेतर्फे राबवला जातो. यावेळी हा उपक्रम शिवम प्रतिष्ठान आणि मअनिस रहिमतपूर असा एकत्रित राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झालेले श्री प्रकाश गायकवाड आणि उपाध्यक्ष पदी निवड झालेले श्री इमरान शेख यांचा सत्कार करत झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन पत्रकार संघाचे उपाध्यक्ष इमरान शेख आणि रहिमतपूर नगरीचे पोलीस पाटील दीपक नाईक साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. दीपक नाईक साहेबांनी या कार्यक्रमासाठी मोठे योगदान दिले. यावेळी रहिमतपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाबद्दल बोलताना मअनिस चे कौतुक करत समाजाने नवीन वर्षाचे आगमन हे शांततेत आणि कसलेही व्यसन न करता करावे असे सांगितले आणि तरुण पिढी आज व्यसनाधीन होऊन बरबाद होत आहे उद्या येणारा काळ ही पिढी कसा सांभाळेल अशी चिंता व्यक्त केली. रहिमतपूर नगरीचे ज्येष्ठ नागरिक माननीय अनंत माने अण्णा व आदर्श शाळा रहिमतपूर चे मुख्याध्यापक अनिल बोधे सर यांनी तरुणांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी एड.अमर माने, प्रवीण माने, विजय जाधव, राजू सय्यद सर, शिवाजी शिंदे, शंकर कणसे, मधुकर माने, प्रकाश बोधे, नाना राऊत सर, सिताराम माने, मोहसीन शेख आणि गावातील इतर कार्यकर्ते हजर होते.

भाऊसाहेब माने कृषी विद्यालय मार्फत विद्यार्थीला रोप लागवडी चे प्रक्षिक्षण

उमरखेड ■ लखन जाधव



उमरखेड : उमरखेड तालुक्यातील ब्राह्मणगाव येथील कृषी महाविद्यालय मार्फत शाळेतील शिक्षक कडून विध्यार्थी ला रोपवाटिका बद्दल माहिती देण्यात आली यावेळी विध्यार्थी ला विविध विविध पिकांची रोपवाटिका मध्ये लागवड कशाप्रकारे करावी नियोजन करून विविध रोपाची लागवड करून त्याची निगा राखावी विविध कलमाची माहिती शिक्षकडून विध्यार्थी ला देण्यात आली यावेळी रोपवाटिका मधून विध्यार्थी ला कलम लागवड कशाप्रकारे करावी त्याची निगा कशाप्रकारे करावी प्रक्षिक्षण देण्यात आले.

कॉमटेक कॉम्प्युटर सेंटर तर्फे कंधार शहरात २०२५ दिनदर्शिकाचे वाटप

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र ज्ञान मंडळ पुरस्कृत कॉमटेक कॉम्प्युटर सेंटर,कंधार तर्फे दिनदर्शिका २०२५ चे शासकीय/निमशासकीय कार्यालय,शाळा,विद्यालय, न्यायालय आदी प्रतिष्ठनाना मोफत वाटप करण्यात आले.कंधार येथे मान्यवरांच्या उपस्थितीत दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा पार पडला. सेंटरचे संचालक मुरलीधर थोटे यांनी या यशस्वी श्रुंखलेचा महत्वाचा भाग असलेल्या कॉमटेक कॉम्प्युटर संस्थेचे कार्य व २१ व्या शतकातील बदलाव आदींची माहिती देत एआय चा प्रभावी वापर व सुरक्षा स्किल्स सह या युगात संगणकाचे महत्व काय आहे व संगणकाच्या ज्ञानाने काय बदलाव घडून आणता येतो या बद्दलची माहिती देत २०२५ चे दिनदर्शिकेचे शहरात वाटप केले.

विशेष म्हणजे हि दिनदर्शिका म्हणजे तारखा,सणवार किंवा पंचाग पाहण्यासाठी मर्यादित नाही,तर २१ व्या शतकातील नूतन वर्षाभिनंदन,पुन्हा एक नवीन वर्ष,पुन्हा एक नवीन अशा,घराला डिजिटलपण देणारा कोर्स,कॉलेज सोबत करा करिअरची तयारी, मोबाईल ?प डेव्हलपर बना, उत्सव रोषणाईचा.. प्रत्येक वेळी एक पायरी हीच यशाची खरी तयारी! अत्यावश्यक डिजिटल कौशल्यासह शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य हेच आमचे ध्येय आदी छायाचित्रांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याचे कार्य तालुक्यातील कॉमटेक कंप्युटर सेंटर करीत आहे.आपल्या शहरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थी २०२५ या साली नवीन तत्रंज्ञानांची नवी दृष्टी घेऊन डिजिटल युगात पुढे जाण्याचा आत्मविश्वास व करिअरचा नवीन पर्याय स्पर्धेच्या युगात नेहमी अग्रेसर असे विविध संदेश दिनदर्शिकांच्या माध्यमातून दाखवणारे ठरत आहे.या उपक्रमाबद्दल शहरातील विविध कार्यालय,शाळा,खाजगी शिकवणीसह महाविद्यालयाच्या वतीने आभार व्यक्त केले जात आहे.

बीडमध्ये आणखी एका सरपंचाला बेदम मारहाण

परभणी ■ दत्तात्रय कराळे

अपहरण करुन पायात ठोकल्या बेड्या, हात-पाय बांधून डांबले एका खोलीत
बीडमध्ये कायदा धाब्यावर; गुंडाई उठली सरपंचांच्या जीवावर



परभणी : पायात बेडी टाईप कुलूप घातलेलं, हात-पाय आवळून बांधल्याचे व्रण, त्याला एका बंद खोलीत डांबल्याचा भयान असा जीवघेणा प्रकार कथित गावगुंडांकडून घडवून आणल्याचा आणखी एक भयान प्रकार पुढे आला आहे. जीवाच्या आकांताने कशीतरी सुटका करवून घेता यावी, म्हणून त्याच अवस्थेत बीडचा एक माजी सरपंच थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाला. एखाद्या चित्रपटात घडावा असा हा भयंकर चीड आणणारा प्रकार ज्ञानेश्वर इंगळे नावाच्या एका माजी सरपंचाच्या बाबतीत घडला आहे. ते केज तालुक्यातील कळंब अंबा येथील रहिवासी आहेत. पंकजा मुंडे यांच्याकडून फंड मिळवून देतो असे सांगून त्याला केज येथून मुंबईला जायचे म्हणत गाडीत बसवले. पाटोदा येथे गेल्यानंतर त्याच्या जवळील तीन लाख रुपये काढून घेतले आणि नंतर त्याचे हात आणि पाय बांधून त्याला एका बंद खोलीत डाबून ठेवले. जीवाच्या आकांताने त्याने कशीतरी आपली सुटका करवून घेत त्याने धावत पळत थेट पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले, असे त्या पीडित सरपंचाने सांगितले.

सदर सरपंचाच्या पायात कुलूप घातल्याचा भयान प्रकार बघून आश्चर्यचकीत झालेल्या पोलीस अधीक्षकांनी या संदर्भात अधीक्षक कार्यालयातच गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते.

विशेष खेदाची बाब म्हणजे या माजी सरपंचाच्या पायात कुलूप लावलेले दिसत आहे. तर हाताला बांधलेले व्रण दिसत आहेत. या प्रकारामुळे संबंध बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा प्रचंड खळबळ उडाली असून याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सरपंचाच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यातील अन्य दोन सरपंचांवर असाच जीवघेणा हल्ला झाल्याची माहिती यापूर्वीच उजागर झाली आहे. त्याला काही अवधी उलटतोय तोच आज आणखी असेच एक संतापजनक प्रकरण समोर आले आहे. त्यामुळे सरपंचाच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सरपंच पदावर काम करणाऱ्या व्यक्तींची सुरक्षितता पुन्हा एकदा धोक्यात आली आहे. पोलीस प्रशासन व महाराष्ट्र शासनाचे सरपंचांवर बेतले जाणाऱ्या अशा जीवघेण्या घटनांकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याने पुन्हा पुन्हा असे प्रकार होत असल्याचे दिसून येत आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या भूमिकेवर आता पुन्हा एकदा संशय निर्माण झाला आहे.

शाळा नंबर २ येथील सिलिंग चे प्लास्टर ढासळले सुदैवाने जीवित हानी टळली

खंडाळा ■ मंगेश माने



सातारा, खंडाळाः लोणंद-लोणंद शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणंद नं ०१ व ०२ मधील पीएमश्री योजनेत समाविष्ट असलेल्या शाळा नंबर - ०२ यातील इयत्ता २ री च्या वर्ग खोलीच्या आतील सिलींगचे प्लॅस्टर अचानक ढासळले सुदैवाने प्रार्थना सुरू काळात सदर घटना घडल्याने जिवीत हानी टळली. याबाबत घडलेल्या घटना समजताच पीएमश्री शाळा व्यवस्थापन समिती चेअरमन तथा साथ प्रतिष्ठाण चे अध्यक्ष कय्युम मुल्ला यांनी धाव घेऊन सदर हकिकत जाणुन घेऊन एकच महिन्यात बसायला लावलेल्या या शाळेच्या दर्जा बाबत संशय व्यक्त करून सदर घटना गांभीर्याने दखल घेऊन तातडीने याच शाळेतील प्रांगणात सहकारी माहिती अधिकार कायदा जनजागृती अभियान केंद्र खंडाळा तालुका अध्यक्ष यशवंत दणाणे, संभाजी ब्रिगेडचे खंडाळा तालुका कार्याध्यक्ष दिपक बाटे आदी समवेत आमरण उपोषणाला सुरु केले आहे.

यापूर्वी या शाळा दुरुस्ती बाबत व योग्य रितीने उभारणी करणेबाबत तथा विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हाधिकारी सो. सातारा. जिल्हा परिषद मुख्याधिकारी ज्ञानेश्वर खिलारी साहेब व शिक्षणाधिकारी शबनम मुजावर यांकडे समक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा दिला होता. सदर अधिकारींचा या विनंतीवर कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. यातच अशा प्रकारची दुर्घटना घडलेने संतप्त होऊन सदर उपोषणकर्ते यांनी या नव्याने उभारण्यात आलेल्या शाळा खोल्यांची बांधकाम दर्जा तपासणी करण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या जिवेतेला धोका निर्माण करणारे संबंधित प्रकल्प अधिकारी व ठेकेदार यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. सदोष खोल्यांची उत्कृष्ट पद्धतीने उभारणी पुन्हा करण्यात यावी आदी मागण्यांसाठी पीएमश्री शाळा व्यवस्थापन समिती चेअरमन तथा साथ प्रतिष्ठाण चे अध्यक्ष कय्युम मुल्ला, माहिती अधिकार कायदा जनजागृती अभियान केंद्र खंडाळा तालुका अध्यक्ष यशवंत दणाणे, संभाजी ब्रिगेडचे खंडाळा तालुका कार्याध्यक्ष दिपक बाटे यांनी आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

तरुणांनी व्यसनापासून दूर राहावेः ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज यांचे प्रतिपादन

समाज उपयोगी कार्य करा म्हणजे मानवी जीवन समृद्ध आणि सफल होईल

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : चांगला समाज घडविण्यासाठी आजच्या तरुणांकडून शिस्तीची गरज आहे. तरुणांनी कोणतेही व्यसन करू नये. व्यसनाच्या आहारी जाऊ नये. व्यसनाच्या आहारी गेलेली तरुणाई उद्ध्वस्त होत आहे. म्हणून तरुणांनो व्यसन करू नका व्यसनापासून दूर रहा चांगले विचार अंगीकारा आई-वडिलांची सेवा करा देव प्राप्त होतो, असे प्रतिपादन ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज यांनी केले

दि.१ जानेवारी रोजी जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे यांच्या द्वितीय पुण्यतिथी निमित्त क्रांतिभुवन बहादरपुरा येथे हरी कीर्तनाचा कार्यक्रम सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी ते बोलत होते. भाई केशवराव धोंडगे यांनी कधीच जातीय व्यवस्था मानली नाही. सामाजिक कार्याबरोबरच ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी शैक्षणिक क्रांति उभी करून गोरगरीबांच्या हजारो मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. म्हणून त्यांचे कार्य आजही समाजासाठी उपयोगी आहे.

अशी माणसं समाजातील गोरगरीब, सामान्य, कष्टकरी, कुणबी, नाहिरेवाल्याच्या उद्धारासाठी जन्माला येतात?. समाज उपयोगी कार्य करा म्हणजे मानवी जीवन समृद्ध आणि सफल होईल असेही ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज यांनी आपल्या मधुर वाणीने कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थितांना संबोधित केले. जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार व खासदार डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी आयुष्यभर गोरगरीब, सामान्य आठरा पगड जातीसाठी गाव, वाडी, तांडयावरील जनतेसाठी सामाजिक कार्य केले म्हणुन डॉ.भाई केशवराव धोंडगे यांच्या कार्याचा आदर्श आजच्या तरुणांनी घेणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ.भाई धोंडगेंच्या अर्धांगिनी चंद्रप्रभावतीबाई धोंडगे, माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे, मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील,?ड.मुक्तेश्वर धोंडगे, प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, प्रा.डॉ.चित्राताई लुंगारे, प्राचार्य डॉ.अशोक गवते यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक व संस्थेतील कर्मचारी उपस्थित होते. भाई केशवराव धोंडगे यांच्या समाधीस्थळी माजी आमदार ज्ञानोबा गायकवाड, माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, जेष्ठ विधीज्ञ ?ड. बी. के. पांचाळ यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी,विविध विभागांचे अधिकारी कंधार लोहा तालुक्यातील नागरीक हजारो संख्येने उपस्थित राहून दिवंगत भाई धोंडगे यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

हे वारकरी संप्रदायाचे व्यासपीठ आहे हे पृथ्वीतलावरती एकच व्यासपीठ असे आहे की सर्व जाती धर्मातील लोक एकत्र येतात व गुण्या गोविंदाने नांदतात या व्यासपीठावरून जातिवाद करायचा नाही.या ठिकाणी मानवी संस्कार मिळतात हिंदु धर्माचे हे कुटुंब आहे. हिंदू धर्मात अठरापगड जाती आहेत आम्ही जातिवाद करणार नाहीत आमचा लढा आरक्षणाचा आहे आमची लढाई जातीवादाची नाही आरक्षणाची आहे.

मनोज दादा जरांगे
मराठा योद्धा

केज तालुक्यातील मस्साजोग येथील खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी

केज ■ तात्या गवळी



केजः तालुक्यातील मस्साजोग शिवारातील १५:एकर जमिनीवर विस्तारलेल्या आवादा ?नर्जी कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटी रुपयाची खंडणी मागितल्या प्रकरणी व त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या वाल्मिक कराड याने पुणे येथील पाषाण भागातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पन केल्या नंतर त्याला केज येथे रात्री ९-३० वाजता आणण्यात आले. केज येथील उपजिल्हा रुग्णालयात अटकपूर्व वैद्यकीय तसपासणी साठी प्रथमता हजर करण्यात आले. त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज हजारे यांनी त्यांची वैद्यकीय तपासणी केली.

त्यानंतर वाल्मिक कराड याला केज पोलीस ठाण्यात अधिकृत अटक करण्याची प्रक्रिया करण्यात आली. रात्री १०-४० वाजता त्याला केज येथील न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूचा उक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीश पावसकर यांनी वाल्मिक कराड याला १४ जानेवारीपर्यंत एकूण १५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. रात्री १२-१५ वाजता वाल्मिक कराड याला बीडकडे रवाना करण्यात आले

ॲड. संतोष देशपांडे यांनी दिला नकार

केज न्यायालयातील सहाय्यक सरकारी वकील ?ड. संतोष देशपांडे यांची या प्रकरणी सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी त्याला नकार दिल्या मुले ऐनवेळी ?ड. जे.बी.शिंदे यांनी सरकारी वकील म्हणून काम पहिले.

एक तास वाहतूक ठप्प.,

केज येथील पोलीस ठाणे आणि न्यायालय हे राष्ट्रीय महामार्गलागत आसल्यामुळे सुरक्षेसाठी साडे नव ते पावणे आकारा या वेळे दरम्यान या राष्ट्रीय महामार्गवरील सर्व वाहतूक ठप्प ठेवण्यात आली होती

खंडिणीच्या आरोपाखाली पोलिसांच्या ताब्यात आसलेल्या वाल्मिक कराड यांच्या परळी, अंबाजोगाई परिसरातील समर्थकांनी केज येथे मोठी गर्दी केली होती. वाल्मिक कराड याला केज येथे आणले आसता, त्याला उपजिल्हा रुग्णालयात घेऊन जाताना कराड यांच्या समर्थकांनी पोलीस, व शासनाच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. नही चलेगी, नही चलेगी दादागिरी नही चलेगी या व इतर घोषणा ही त्यांनी दिल्या. त्यांना पांगविण्यासाठी पोलिसांनी त्यांना समज दिली.छत्रपती संभाजी नगर येथील सीआयडीचे पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी रात्री १०-१८ वाजता न्यायालयच्या मुख्य प्रवेश द्वारातून न्यायालयात प्रवेश केला.

श्रीक्षेत्र शेगांव येथे एक लाख , एकवीस हजार , एकशे एकवीस , लाडू साहित्य देणार

श्री संत गजानन महाराज हरिपाठ मंडळ मानेवाडा नागपूर यांचा संकल्प

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः श्री गजानन महाराज दर्शनाला गेल्यानंतर श्रीक्षेत्र शेगांव येथे हजारो भक्तांना अव्याहत अन्न भोजन प्रसाद मिळत असतो. अशा या भव्य कामात आपलाही काही मुंगीचा वाटा असावा. असा विचार श्री संत गजानन महाराज हरिपाठ मंडळाचे श्री. चंद्रशेखर क्षेत्रपाल यांच्यासह काही भक्तांच्या मनात आला आणि इ. स. २०२५ च्या जानेवारीत सुरुवातीलाच शेगांव येथील संस्थांन प्रसादालयात एक लाख एकवीस हजार एकशे एकवीस बुंदीचे लाडू साठी आवश्यक साहित्य देण्याचं निश्चित झालं.

श्री. राजूभाऊ भोतमांगे यांच्याकडील जन्माष्टमी कार्यक्रमात आवाहनाला प्रतिसाद मिळून एकवीस हजाराच्या आकड्याने निधी संकलनास सुरुवात झाली. अर्थात एवढ्या मोठ्या प्रमाणावर साखर, शुद्ध तूप, बेसन, सुकामेवा. इत्यादी साहित्य म्हटल्यावर अकरा लाखांहून अधिक निधी आवश्यक होता. मात्र अगदी गरिबापासून प्रत्येक स्तरातील भक्तांनी हातभार लावून हे कार्य सुलभ झालं. निधी संकलन कार्यात हिरडे दादा आणि राजू गुजर दादा यांनी आश्वासन देऊन निधी संकलनात आत्मविश्वास वाढीस लावला. ज्यांनी निधी संकलनात सहकार्य केले अशा भक्तांना प्रसाद रुपी लाडू देऊन त्यांचे आभार व्यक्त करण्यात येतील. हे संपूर्ण प्रसाद साहित्य दिनांक ५ जानेवारीला शेगांव रेल्वे स्टेशन ते श्री गजानन महाराज मंदिरापर्यंत महाराजांच्या दिंडीसह सजविलेल्या ट्रकमध्ये ठेवून मंदिरात समर्पित करण्यात येईल. या कार्यासाठी श्री क्षेत्रपाल दादांसह रंजनजी बिजवे, राजेश गुजर, विनोद फेददेवार, सुरेश चौधरी, देवराव प्रधान, व मंडळाचे अन्य सदस्य हे परिश्रम घेत आहेत. श्री गजानन महाराज उपासना केंद्राचे, जयंत वेलणकर यांचं यात उल्लेखनीय मार्गदर्शन प्राप्त झालं. शनिवार दिनांक ४ जानेवारी ला महाराजांचे दोन-तीनशे भक्त या कार्यासाठी शेगांवला रवाना होत आहेत.

कोराडी येथील महालक्ष्मी मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

५० हजार पेक्षा जास्त भाविकांनी घेतले मातेचे दर्शन; कोराडी मंदिराला आले जत्रेचे रूप; जय माता दी जय माता दी च्या गजराने दुमदुमले कोराडी मंदिर



कोराडी ■ दिलीप येवले

कोराडी : आजपासून नवीन वर्षाला प्रारंभ झाल्याने लोकांनी नवीन वर्षाची सुरुवात मातेच्या दर्शनाने व्हावे व जीवनात सुख, संपत्ती, शांती, आरोग्य, धन संपदा मिळावी याकरिता कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा मातेच्या दर्शनाकरिता जवळपास ५० हजार भाविकांनी मातेचे दर्शन घेतले. यामुळे कोराडी मंदिरला जत्रेचे स्वरूप पाहायला मिळाले. जय माता दी, जय माता दी च्या गजराने मंदिर दुमदुमले होते.

मातेच्या दर्शनाकरिता भाविकांनी लांबच लांब रांगा लावलेल्या होत्या. प्रत्येकानी मनोभावण्याने मातेचे दर्शन घेतले व आनंद व्यक्त केला. मंदिर परिसरात विविध दुकाने सजलेली होती.

डॉ. किशोर बाबूराव दळवे हे पीएचडी देऊन सन्मानित



केज ■ तात्या गवळी

केजःकेज तालुक्यातील चिंचोली(माळी) येथील भूमिपुत्र डॉ. किशोर दळवे यांनी एमजीएम युनिव्हर्सिटी संभाजीनगर या विद्यापीठाची मानाची पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. किशोर दळवे यांनी बीबीए, एमबीए (एच आर) एमबीए (आर ए बी एम); एमसीए या पदव्या विविध विद्यापीठाकडून प्राप्त केल्या असून असून नुकतेच त्यांना मॅनेजमेंट सायन्स या विषयात पीएचडी ही पदवी दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सपकाळ सर यांच्या हस्ते देऊन विद्यापीठाच्या विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

त्यांना डॉ.प्रवीण शास्त्री सरांचे मार्गदर्शन लाभले असून या पदवीदान कार्यक्रमास ईतर मार्गदर्शक व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ.किशोर दळवे त्यांचा सत्कार करण्यात आला ? त्यांच्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांचे अभिनंदन मुख्यतः पुढील पदाधिकारी, नातेवाईक व सहकारी यांनी केले आहे यात, दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सौ.आशा दळवे; डॉ. दया पाटिल ;डॉ?. कोरडे सर ;श्री बाबुराव दळवे;श्री दगडू भाऊ दळवे; श्री महादेव दळवे;श्री अशोक मिरगे श्री.वसंतभाऊ कातळे,श्री शिवाजीराव जाधव,श्री अशोक तारळकर तसेच त्यांचा मित्रपरिवार व सहकारी, पत्रकार बांधव यांचा समावेश आहे.

नविन बिना बौद्ध विहारात शौर्य दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन !

खापरखेडा ■ दिलीप येवले



खापरखेडाः स्थानिक भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्र महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भीमा कोरेगावच्या लढाईतील हुतात्म्यांना नवीन बिना बौद्ध विहारात शौर्य दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात तथागत गौतम बुद्ध, सेनापती सिद्धनाक, संविधान निर्माता विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यांच्या छायाचित्रावर ज्येष्ठ नागरिक सल्लागार समितीचे सदस्य तुळशीराम बागडे व कांता बागडे यांच्या हस्ते माल्यार्पण, निळा ध्वज फडकावून आणि सामूहिक वंदना घेवून करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा बिना आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष जितेंद्र सावजी तागडे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात भीमाकोरेगावची लढाई ही मूलभूत मानवी हक्कांची आणि अस्मितेची लढाई होती असे मत मांडले. तर मीना नरेश ढोके यांनी गीतांच्या माध्यमातून अभिवादन केले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, नरेश डोंगरे, मनोहर गजभिये, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, विनायक गौरकर, चंद्रिकापुरे, सुरेश गजभिये, आनंद वासनिक, पृथ्वीराज गोलाईत, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या अंजना मेश्राम, रेखा लांजेवार, बेबी वासनिक, निर्मला चिमनकर, नंदा सोमकुंवर, सत्यभामा वासनिक, सुनंदा लांजेवार, सारिका तागडे, कल्पना वासनिक, प्रिती गोलाईत, प्रिया डोंगरे, कल्पना वासनिक , न्यू परिवर्तन मिशन स्कूलच्या प्राचार्य अर्चना पाटिल, नेहा रॉय, वैशाली पाटील, प्रवीणा वाघमारे, अंजली निकोसे, सुष्मा पाटील, सना शेख, आसमा शेख, प्रगती दुनेदार व विद्यार्थी तसेच परिसरातील बाला-बालिका व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वंदना गणवीर, सूत्र संचालन कोषाध्यक्ष रविंद्र ढोके व आभार मालवी नारनवरे यांनी मानले.

नवीन वर्षाचे मोठ्या उत्साहात स्वागत



सेलू ■ प्रशांत झाडे

सेलूः स्थानिक श्री. संत केजाजी कॉन्व्हेन्ट घोराड येथे नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने साजरे करण्यात आले. यावेळी सर्व प्रथम शाळेचे संस्था संचालक तथा मुख्याध्यापक प्रशांत झाडे यांनी श्री. संत केजाजी महाराज यांच्या फोटो चे विधिवत पूजन केले, वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थि हे नवीन कलर फुल पोशाख परिधान करून शाळेत आले होते. नवीन वर्षाच्या स्वागता करिता शाळेत विविध कलाकृती निर्माण करून विद्यार्थ्यांनी शाळेत आणत शिक्षकांच्या मदतीने सजावट करण्यात आली होती. सदर प्रसंगी चिमुकल्यांनी केक कापत आनंद साजरा केला. यावेळी शाळेतील शिक्षिका सुवर्णा पिसे, स्वाती फट्टींग, प्रीया शिंदे, आरती भुरे उपस्थित होते.

पुरोगामी पत्रकार संघाच्या राज्य सचिव पदी दत्तात्रय मुजमुले यांची निवड

केज ■ तात्या गवळी



केजः राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची नवीन वर्ष २०२५ ची राज्य कार्यकारणी संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांनी जाहीर केली.त्यात केज तालुक्याचे भूमिपुत्र पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांची राज्य सचिव पदी निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या आदेशानुसार दैनिक प्रभास केसरीचे कार्यकारी संपादक तथा स्टार २४ न्यूज चॅनेलचे संपादक दत्तात्रय मुजमुले यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या राज्य सचिव पदी पदी निवड करण्यात आली आहे.पुरोगामी पत्रकार संघात मुजमुले यांनी सन २०१८ पासून संघात तालुका उपाध्यक्ष पदापासून काम सुरू केले होते.सन २०१९-२० साली तालुकाध्यक्ष म्हणून काम पाहिले होते.त्यानंतर त्यांनी बीड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख जबाबदारी पार पाडली होती.तर मागील वर्षी २०२४ साली बीड जिल्हाध्यक्ष म्हणून आणि प्रभारी राज्य प्रसिध्दी प्रमुख म्हणून ते कार्यरत होते. पुरोगामी पत्रकार संघात काम करत असताना दिव्यांग सेवा समिती,कला क्रीडा विश्व समितीचीही शाखा तयार केल्या आहेत.तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संघाची शाखा त्यांनी तयार केलेल्या आहेत.

पुरोगामी पत्रकार संघात आजवर विविध पदावर केलेल्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, पत्रकार बांधव यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येते आहे.

सर्वसामान्यांसाठी असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत सुलभतेने पोहचाव्यात यावर भरः महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

कोराडी महालक्ष्मी ते अयोध्या तिर्थदर्शन यात्रेस प्रारंभ

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी :केंद्र सरकार व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहचाव्यात यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. सर्वसामान्यांना अधिकाधिक योजनांचा लाभ व्हावा यादृष्टीने मुख्यमंत्री तीर्थदर्शन यात्रा ही अनेक गोरगरिबांना आपल्या इच्छांची पूर्ती करणारी यात्रा म्हणून महत्वाची आहे. यादृष्टीने विचार करुन कोराडी महालक्ष्मी जगदंबा संस्थेच्यावतीने महालक्ष्मी ते अयोध्या तिर्थयात्रेचा आज शुभारंभ करण्यात आला. पहिल्याच यात्रेत आमच्या कष्टकरी लाडक्या बहिणींना अयोध्या येथील तिर्थदर्शनाचा लाभ होत असल्याचा मनस्वी आनंद आहे असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

कोराडी महालक्ष्मी संस्थांच्यावतीने आयोजित या तिर्थयात्रेचा शुभारंभ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर व इतर मान्यवर उपस्थित होते. वातानुकुलीत बसद्वारे सुमारे ५४ महिला यात्रेकरुंना यात संधी मिळाली.

महिण्यातून दोन वेळा ही यात्रा अयोध्याला जाईल. आजच्या यात्रेकरुमध्ये अनेक बहिणी या दररोज रोजीवर कामाला जाणाऱ्या आहेत. तिर्थयात्रा करण्याचे स्वप्न त्यांनी मोठ्या आशेने बाळगले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे आजवर पूर्ण न होणारी त्यांचे हे स्वप्न या तिर्थयात्रेच्या माध्यमातून पूर्ण होत आहे हे अधिक महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कालांतराने ही योजना मुख्यमंत्री तिर्थदर्शन यात्रेच्या स्वरुपात अधिक परिपूर्ण करु असे त्यांनी स्पष्ट केले.

माझे स्वप्न पूर्ण झाले
- देवांगना कटरे

मला मुली आहेत. मुलींचे लग्न झाले. पती नाही. मी एकटीच आहे. शेतात व इतर ठिकाणी रोजीने कामाला जाऊन माझा उदरनिर्वाह मी भागविते. माझ्या मनातही तिर्थक्षेत्र यात्रेची अनेक वर्षांपासून इच्छा होती. आज ती इच्छा या तिर्थक्षेत्र यात्रेच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याचे भावूग उद्गार देवांगना कटरे यांनी काढले. माझ्या समवेत असलेल्या इतर महिलांनाही याचा मनस्वी आनंद असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. या यात्रेत सहभागी यात्रेकरुंपैकी बहुतेकजण वयाच्या साठीपेक्षा अधिकवर्ष पूर्ण केलेले ज्येष्ठ नागरीक आहेत.

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या मध्यस्थीने जल समाधी आंदोलन मागे फरार आरोपींना १० दिवसांत अटक करण्याची पोलीस अधीक्षकांची ग्रामस्थांना ग्वाही

केज ■ तात्या गवळी

केजः पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या मध्यस्थीने जल समाधी आंदोलन मागे घेण्यात आले.फरार आरोपींना १० दिवसांत अटक करण्याची पोलीस अधीक्षकांनी ग्रामस्थांना ग्वाही दिली आहे.मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मोठी खळबळ निर्माण झाली. बीडमध्ये सर्वपक्षीय आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आता मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक होताना दिसत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार तीन आरोपींना तात्काळ अटक करा. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन व पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांच्यासह दोषी पोलिसांना तात्काळ बडतर्फ करून त्यांना ३०२ च्या गुन्ह्यामध्ये सह आरोपी करण्यात यावेत. संतोष देशमुख हत्येप्रकरणी गावकऱ्यांनी परिसरातील तलावात जलसमाधी आंदोलन सुरू केले. यानंतर जवळपास दोन ते तीन तास महिला पाण्यामध्ये आंदोलन करत होत्या त्यामुळे महिलांनी तब्येत खराब झाली यामध्ये वृद्ध महिलांना चक्कर येऊन पाण्यात पडल्या त्यानंतर एका महिलेला पोलिसांच्या गाडीमध्ये उपचारा करतात नेण्यात आले तर दोन महिलांना ?म्बुलन्स मध्ये नेण्यात आले. जल आंदोलन ठिकाणी पोलिस अधीक्षक पोहोचले. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली आणि पोलिस अक्षीक्षकांच्या मध्यस्थीनंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनामध्ये पुरुषांसह महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हे आंदोलन दोन ते तीन तास सुरू होते. तरूण आणि महिला देखील या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.वाल्मिक कराडच्या सुनावणीवेळी केज कोर्टाबाहेर हायव्होल्टेज ड्रामा, पोलिसांनी केला लाठीचार्ज, मोठ्या घडामोडीदोन तास सुरू असलेल्या आंदोलनाला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी भेट दिल्यानंतर गावकऱ्यांनी हे आंदोलन मागे घेतले. यावेळी कॉवत यांना महिलांनी जाब विचारत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. यावेळी पोलीस अधीक्षक यांच्यासमवेत चर्चा करत असताना महिला म्हणाल्या की, आरोपीला केज येथील न्यायालयात हजर केले असता त्या ठिकाणी १०० पोलीस तैनात करण्यात आले होते परंतु आमच्या या आंदोलनाच्या ठिकाणी आमच्या महिला बेशुद्ध पडले असता एकही पोलीस कर्मचारी पाण्यात उतरला नाही व आमच्या व्यथा समजून घेऊ शकला नाही त्याचबरोबर केज पोलीस हे आम्हाला न्याय देत नाहीत त्यामुळे आमचा केज पोलिसांवर विश्वास नाही असा आरोप केज पोलिसांवर महिलांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे केला आहे.

या ठिकाणी पोलीस प्रशासनाच्या वतीने तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे हे त्यांच्या कर्मचाऱ्यासह तळ ठोकून होते. त्याचबरोबर आरोग्य विभागाचे डॉक्टर आणि कर्मचारी हेही उपस्थित होते.

ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांच्या विनंतीला मान देऊन तात्पुरत्या स्वरूपात आंदोलन मागे घेतले आहे जर दहा दिवसात आरोपींना अटक करून ग्रामस्थांच्या मागण्या पूर्ण न केल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील ग्रामस्थांनी प्रशासनाला यावेळी दिला आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242